**विषय :- सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नोंदणीस मान्यता प्रदान करणेबाबत.**

**कृषि आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,शिवाजीनगर पुणे-४११ ००५.**

कृआआ-२०२०/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/भाग-१/प्र.क्र.०७/१४६/८४३१/फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे - ४११ ००५,
दि. 02/03/२०२१

**वाचा :-** १) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना फ.नं.११-१४२/२०१५-हॉर्ट,दि.२५ ऑगस्ट,२०१७
२) शासन पत्र ssy-2018/C.R.3/14-A,दि.१३.०२.२०१८ सोबतचे प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत ७ व्या राज्यस्तरीय मान्यता समितीचे इतिवृत्तांतातील अ.क्र.६ मधिल परिच्छेद -२ मधिल मा.मुख्य सचिव यांचे निर्देश.
३) कृषि आयुक्तालयाचे आदेश क्रमांक कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/भाग-१/प्र.क्र.०१/२३८, दि.०९.०३.२०१९
४) शासन निर्णय क्रमांक प्रकृसिं-५२०/प्र.क्र.५८/१४-अे,दि.२१/१०/२०२०
५) प्र.म.कृ.सिं.यो. अंतर्गत सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांच्या नोंदणीसाठी कृषि आयुक्तालयस्तर गठीत छाननी समितीच्या दि २७/०१/२०२१ रोजीच्या दुसऱ्या बैठकीचा इतिवृत्तांत.

**आदेश**

उपरोक्त वाचा येथिल (अ.क्र.२) दिनांक १३ फेंब्रुवारी,२०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत ७ व्या राज्यस्तरीय मान्यता समितीच्या दि.२८ जानेवारी,२०१९ रोजी आयोजीत बैठकीच्या इतिवृतांतातील चर्चा / सूचना / निर्णय मधिल अ.क्र.६ मधिल परिच्छेद -२ मध्ये मा.मुख्य सचिव यांनी सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांच्या नोंदणी संदर्भात कृषि आयुक्तालयस्तरावर छाननी समिती गठीत करण्याबाबत निर्देशित केले आहे. तसेच, सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांच्या नोंदणीसाठी निम्न स्वाक्षरीकार यांना प्राधिकृत केलेले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.३ वरील आदेशान्वये संचालक,फलोत्पादन यांचे अध्यक्षतेखाली कृषि आयुक्तालयस्तरावर छाननी समिती गठीत करण्यात आलेली आहे

संचालक,फलोत्पादन यांचे अध्यक्षतेखालील छाननी समितीच्या दि २७/०१/२०२१ रोजी आयोजीत सन २०२०-२१ मधील दुसऱ्या बैठकीमध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील अटी व शर्तीची पुर्तता होत असलेल्या **४ ठिबक** सिंचन व **२ तुषार** सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नोंदणीस मान्यता देण्यासाठी शिफारस केलेली आहे. त्यानुसार सर्वदृष्टया वैध असलेल्या व भारतीय मानक ब्युरोचे (BIS) वैध प्रमाणपत्र तसेच, जीएसटीएन व डीआयएन क्रमांकाचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या सोबत जोडलेल्या ***परिशिष्ट- १*** मध्ये नमूद ४ ***टिबक सिंचन संच उत्पादक व परिशिष्ट- २ मध्ये*** नमूद **२ तुषार *सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या*** नवीन नोंदणीस सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हयांमध्ये सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सूक्ष्म सिंचन योजना अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांची करण्यात आलेली नोंदणी ***सन २०२०-२१ ते २०२४-२५*** या पाच (५) वर्षासाठी वैध राहिल. मात्र सदरहू कंपन्यांनी पुढील प्रत्येक वर्षी कृषि आयुक्तालयाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरुन नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

२. या आदेशान्वये नोदणीस मान्यता देण्यात आलेल्या कंपन्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रत्येक घटकांच्या बीआयएस वैधतेची मुदत संपल्यानंतर एक महिन्याचे आत वैध बीआयएस प्रमाणपत्र कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील. अशी कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास त्या कंपनीचे नोदणी आपोआप रद्द होईल.

३. नोंदणीच्या वेळी नोंदणीकृत कंपन्यानी सादर केलेल्या दरपत्रकातील दरापेक्षा जास्त दराने, कोणत्याही घटकांची विक्री करता येणार नाही. तसेच सदरचे दरपत्रक कृषि आयुक्तालयाच्या ई-ठिंबक आज्ञावलीवर नोंदणीवेळी नोंदणीकृत कंपन्यानी भरणे आवश्यक आहे. नोंदणीकृत कंपन्यांनी त्यांच्या दरपत्रकात त्या आर्थिक वर्षात वाढ किंवा घट केल्यास इ-ठिंबक आज्ञावलीवर भरणे व कृषि आयुक्तालयास त्वरित कळविणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

४. नोंदणीप्राप्त जिल्हयात विक्रिपश्चात सेवा केंद्र उभारणी करणे व त्याबाबतची आवश्यक ती माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करुन त्यांची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संबधीत नोंदणीकृत कंपन्यांची राहील.

५. नोंदणीकृत कंपन्यानी मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयातील त्यांच्या वितरकांची यादी नोंदणीसाठी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करुन त्यांची नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.

६. नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनीने उत्पादीत केलेल्या व वितरकांना पुरवठा केलेल्या सर्व घटकांचा घटकनिहाय अहवाल दरमहा महिना संपताच पुढील माहिन्याच्या १० तारखेपर्यत मार्गदर्शक सुचनातील विहीत प्रपत्र-५(अ) व ५(ब) मध्ये सादर करणे आवश्यक राहील.

७. नोंदणीस मान्यता दिलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनीने उत्पादीत केलेल्या व कंपनीने प्राधिकृत केलेल्या वितरकास पुरवठा केलेल्या आणि वितरकांनी सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विक्री केलेल्या सर्व घटकांचा घटकनिहाय अहवाल दरमहा महिना संपताच पुढील माहिन्याच्या १० तारखेपर्यत विहीत केलेल्या प्रपत्रामध्ये विहीत मार्गाने सादर करणे आवश्यक राहील.

८. सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांनी निश्चीत केलेल्या उद्दीष्ठाप्रमाणे सुक्ष्म सिंचनाची कामे करण्याची जबाबदारी संबंधित उत्पादकांची राहील. तथापी,उत्पादक कंपनीला राज्यात किमान ५०० हेक्टर क्षेत्रावर सुक्ष्म सिंचनाची कामे करणे बंधनकारक राहील. तसेच, मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयामध्ये किमान १०० हेक्टर क्षेत्रावर सुक्ष्म सिंचनाची कामे करणे बंधनकारक राहील.

**सोबतः परिशिष्ट- १ नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या ठिबक व**
**परिशिष्ट- २ नोंदणीस मान्यता देण्यात तुषार सिंचन संच उत्पादकांची यादी.**

आयुक्त कृषि
महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रति,**

मे. ----------------------------------
----------------------------------
----------------------------------
----------------------------------
----------------------------------

**प्रतिलिपी - यांना माहितीसाठी व पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषीत.**

**१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

१/- सन २०२०-२१ या वर्षासाठी सुध्दा जिल्हास्तरावर संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयातील वितरकांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वितरक नोंदणीसाठी आवश्यक असलेले व कृषि आयुक्तालयाने विहित केलेले ***शुल्क रु.२७५०/- (अक्षरी रु.दोन हजार सातशे पन्नास फक्त) ग्रासप्रणालीव्दारे /चलनाव्दारे खालील लेखाशिर्षांतर्गत भरुन घ्यावे.*** तसेच रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) रकमेची बँक गॅरंटी घेवून दि.११/०९/२०१९ रोजीच्या मार्गदर्शक सुचनानुसार वितरकांची नोंदणी करावी.(ठिबक व तुषार या करीता शुल्क स्वतंत्र भरण्याची आवश्यकता नाही)

**मागणी क्र.डी.-१**
**०४०१ - पीक संवर्धन**
**८००, इतर जमा रकमा**
**(०१)(१२) इतर बाबी**
**(०४०१०४५५)**

२/- संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांचे जिल्हातील सुक्ष्म सिंचन वितरक या दोघामधील कृषि आयुक्तालयाने विहित करुन दिलेल्या नमुन्यातील करारनामा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर नोटराइज्ड करुन घ्यावा.

३/- सन २०२०-२१ मध्ये सुक्ष्म सिंचन योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता कंपन्या त्यांचे वितरक/विक्रेते तसेच कृषि विभागाच्या अधिकारी/कर्मचा-यांनी घेणे आवश्यक आहे.

**आयुक्त कृषि**
महाराष्ट्र राज्य,पुणे

परिशिष्ट - १

सन २०२०-२१ साठी नोंदणी केलेल्या *ठिबक सिंचन* संच उत्पादकांची यादी

| अ. क्र. | कंपनीचे नाव / पत्ता / संपर्क क्रमांक व इमेल | जी.एस.टी.एन. / डी.आय.एन.क्रमांक | बी.आय.एस.नोंदणीक्रमांक व त्याचा वैधताकालावधी | | | | मान्यताप्राप्त जिल्हे | वैधता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Lateral BIS- 12786 CML no. & validity | Emiiter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| १ | मे. एम.के.ड्रिप एरिगेशन, प्लॉट नं.२७४/२, सहकारी औद्योगिक वसाहत, ता. भडगांव, जि., जळगांव (महाराष्ट्र) mkdrip123@gmail.com | 27ABCFM1485G2Z8 Partnership | 7800061314 Dt. 16.04.2021 | 7362675 Dt. 09.01.2021 | 7800061415 Dt. 16.04.2021 | 3954983 Dt. 11.06.2021 | जळगाव, धुळे, औरंगाबाद, जालना (एकुण जिल्हे-४) | २०२०-२१ ते २०२४-२५ |
| २ | मे.मालपाणी पाईप्स अँड फिटिंग्स प्रा.लि. ६५-ए, सेक्टर बी, इंडस्ट्रियल एरिया, ता.जि.रतलाम (मध्यप्रदेश) Pipes@malpanipipes.com | 23AAKCM7865N1ZQ 07691974 07691981 08671175 | 8200098715 Dt. 06.08.2021 | 7160663 Dt. 31.05.2021 | 8200112089 Dt. 25.08.2021 | 3006128 Dt. 30.06.2021 | वाशिम, अकोला (एकुण जिल्हे-४) | २०२०-२१ ते २०२४-२५ |
| ३ | मे. गोल्डन प्लास्टिक, एन एच २७, जानकी ऑईल मिल कंपाउंड, पेढला, (जेतपूर) ३६०३७० राजकोट (गुजरात) caregolden99@gmail.com | 24ABEPD5779L1ZD Proprietorship | 7350769 Dt. 21.10.2021<br>7210955 Dt. 31.05.2021 | 7160663 Dt. 31.05.2021 | 7600126815 Dt. 05.02.2021 | 7600095713 Dt. 07.05.2021 | बीड, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली, औरंगाबाद, जालना (एकुण जिल्हे-६) | २०२०-२१ ते २०२४-२५ |

परिशिष्ट - १

सन २०२०-२१ साठी नोंदणी केलेल्या *ठिबक सिंचन* संच उत्पादकांची यादी

| अ. क्र. | कंपनीचे नाव / पत्ता / संपर्क क्रमांक व इमेल | जी.एस.टी.एन. / डी.आय.एन.क्रमांक | बी.आय.एस.नोंदणीक्रमांक व त्याचा वैधताकालावधी | | | | मान्यताप्राप्त जिल्हे | वैधता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Lateral BIS- 12786 CML no. & validity | Emiiter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| ४ | मे.कायरा टेक्नोप्लास्ट प्रा.लि. ४८/२ बारदिया ग्राम,निरंजन नगर, कसरावाड रोड, खरगोन-४५१ ००१ (मध्यप्रदेश) kairaplast@gmail.com | 23AAHCK6093K1Z7<br>03440880<br>03476749 | 8200117305 Dt. 04.11.2021 | 8200118206 Dt. 10.11.2021 | 8200118004 Dt. 09.11.2021 | 3006128 Dt.30.06.2021<br>7714781 Dt.01.03.2021<br>8400102912 Dt.23.07.2022<br>7272068 Dt.31.07.2021<br>7025556 Dt.31.08.2022 | नागपुर, भंडारा, अमरावती, यवतमाळ (एकुण जिल्हे-४) | २०२०-२१ ते २०२४-२५ |

आयुक्त कृषि

महाराष्ट्र राज्य, पुणे

परिशिष्ट-२

सन २०२०-२१ साठी नोंदणी केलेल्या तुषार सिंचन संच उत्पादकांची यादी

| अ. क्र. | कंपनीचे नाव / पत्ता / संपर्क क्रमांक व इमेल | जी.एस.टी.एन. / डी.आय.एन.क्रमांक | बी.आय.एस.नोंदणीक्रमांक व त्याचा वैधताकालावधी | | | मान्यताप्राप्त जिल्हे | वैधता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Sprinkler Pipes Part-I Polyethylene Pipe BIS – 14151 (Part-I) | Sprinkler Pipes Part-II Polyethylene Pipe (QCPP) BIS - 14151(Part-II) | Rotating Sprinkler Nozzle BIS - 12232 | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| १. | मे.कायरा टेक्नोप्लास्ट प्रा.लि.<br>४८/२ बारदिया ग्राम,निरंजन नगर, कसरावाड रोड, खरगोन-४५१ ००१ (मध्यप्रदेश)<br>kairaplast@gmail.com | 23AAHCK6093K1Z7<br>03440880<br>03476749 | ----- | 8200117103<br>Dt.<br>01.11.2021 | 8939410<br>Dt.30.06.2021<br><br>8205260<br>Dt.30.06.2021<br><br>3709364<br>Dt.16.03.2021<br><br>8528587<br>Dt.28.02.2022 | नागपुर, भंडारा, अमरावती, यवतमाळ (एकुण जिल्हे-४) | २०२०-२१<br>ते<br>२०२४-२५ |
| २. | मे.पॉलिराज पाईप्स एल.एल.पी.<br>राऊ पिठांमपुर बायपास,<br>पोस्ट राऊ, इंदोर-४५३३३१,<br>मध्यप्रदेश<br>marketing2@polyraj.com | 23AAYFP8342C1Z0<br>00219326<br>00219328<br>06865694 | ----- | 8200120088<br>Dt.<br>06.12.2021 | 8210859<br>Dt. 31.08.2022<br><br>8205260<br>Dt.30.06.2021 | पुणे, नगर<br>(एकुण जिल्हे-२) | २०२०-२१<br>ते<br>२०२४-२५ |

2/3.

आयुक्त कृषि
महाराष्ट्र राज्य,पुणे